# सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र

## (Micro and Macro Economics)

अर्थशास्त्रात अभ्यास विषयाचे विश्लेषण दोन प्रकारे करता येते.

अ) सूक्ष्म विश्लेषण (Micro Analysis)

ब) स्थूल विश्लेषण (Macro Analysis)

यालाच व्यष्टी विश्लेषण व समष्टी विश्लेषण असे देखील म्हणतात. व्यष्टी व समष्टी या संकल्पनांचा उपयोग सर्वप्रथम रॅगनर फ्रिश (Rangnar Frisch) ह्यांनी १९३३ मध्ये केला. असे असले तरी व्यष्टी व समष्टी विश्लेषण अर्थशास्त्रज्ञांनी यापूर्वीच केले आहे. माल्थस, सिस्मोदी, कार्लमार्क्स, केन्स वालरस, विकसेल, फिशर, कॅसेल, रॉबर्टसन, हायेक हॉट्रे या अर्थशास्त्रज्ञांनी समष्टी दृष्टीकोणातून अर्थशास्त्रांची मांडणी केली. तर ॲडम स्मिथपासून पुढे डेव्हीड रिकार्डो, जे.एस. मील मॉरिस डॉब, बोल्डिंग डॉ. मार्शल, पिगू, हिक्स प्रो. सॅम्युअलसन, श्रीमती रॉबर्टसन यांनी व्यष्टी दृष्टीकोनातून अर्थशास्त्रात मांडणी केली.

समष्टी व व्यष्टी विश्लेषणावरूनच अर्थशास्त्राचे व्यष्टी अर्थशास्त्र किंवा सूक्ष्म अर्थशास्त्र व समष्टी किंवा स्थूल अर्थशास्त्र असे दोन भाग पडले.

## सूक्ष्म अर्थशास्त्र (Micro Analysis)

Micro शब्दाची व्युत्पत्ती Micros या ग्रीक शब्दापासून झाली. Micros म्हणजे लहान असा अर्थ होतो. तसेच इंग्रजीमध्ये Microम्हणजे सूक्ष्म. त्यावरूनच सूक्ष्म अर्थशास्त्र हा शब्द निर्माण आहे. सूक्ष्म अर्थशास्त्र अर्थशास्त्राच्या लहान लहान घटकांचा अभ्यास करते. उदा. एक उद्योग, एक पेढी, एका वस्तुची मागणी, एका वस्तुचा पुरवठा, एका वस्तूची बाजारपेठ, एक उपभोक्ता अशा एका घटकाचे अध्ययन केले जाते.

## स्थूल विश्लेषण (Macro Analysis)

Macro हा शब्द ग्रीक भाषेतील Macros या शब्दापासून उत्पन्न झाला. Macros म्हणजे मोठा. तसेच इंग्रजीत Macro या शब्दाचा अर्थ स्थूल असा होतो . त्यावरूनच स्थूल अर्थशास्त्र हा शब्द निर्माण झाला आहे. यामध्ये संपूर्ण समूहाचा अभ्यास केला जातो. उदा. एकूण राष्ट्रीय उत्पन्न, एकूण गुंतवणूक, एकूण रोजगार, एकूण उपभोग एकूण बचत, एकूण मागणी अशा एकूण घटकांचा अभ्यास केला जातो.

यावरून सूक्ष्म अर्थशास्त्र हे आर्थिक विश्लेषणाचे असे स्वरूप आहे की जे अर्थव्यवस्थेच्या छोट्या छोट्या भागाचे अध्ययन भागाचे अध्ययन करते तर स्थूल अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या भागाचे अध्ययन करते.

## सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या -

प्रा. के. ई. बोल्डींग यांनी सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली.

''विशिष्ट पेढी, विशिष्ट कुटूंब, व विशिष्ट किंमती, मजुरी उत्पन्न, वैयक्तिक उद्योग आणि विशिष्ट वस्तूचे अध्ययन करणारे शास्त्र होय.''

"Micro Economics is th study of particular firms, particular households, individual prices, wages, incomes, individual; Industries and particular commodities." K.E. Boulding.

व्याख्येवरून हे स्पष्ट होते की सूक्ष्म अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार केला जात नाही तर विशिष्ट पेढीद्वारे उत्पादित वस्तूचा वैयक्तिक व उद्योगाच्या मागणीचा विचार केला जातो. वस्तूची किंमत कशी निश्चित होते, श्रमिकांची मजुरी कशी निश्चित होते? उत्पादन घटकाचा मोबदला कसा निश्चित होतो? वैयक्तिक उत्पन्न व खर्च, वैयक्ति उद्योगाचे व्यवस्थापन, विशिष्ट वस्तूची मागणी पुरवठा याचा विचार केला जातो.

## सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती.

सूक्ष्म अर्थशास्त्रात खालील विषयांचा अभ्यास केला जातो.

१) उपयोग - सूक्ष्म अर्थशास्त्रात उपभोगाशी संबंधित मागणी, आऱ्हासी उपयोगिता नियम, संतोषाधिक्य, समसीमांत उपयोगिता नियम, तटस्थता वक्राद्वारे उपभोक्त्याचे संतुलन इत्यादी घटकांचा अभ्यास केला जातो.

२) उत्पादन - सूक्ष्म अर्थशास्त्रात उत्पादनाशी संबंधित पेढीला वस्तूच्या उत्पादनासाठी येणारा उत्पादन व्यय, उत्पत्तीचे नियम, उत्पादनाचे परिमाण याचा अभ्यास केला जातो.

३) विनिमय - विशिष्ट वस्तूची किंमत पूर्ण स्पर्धा, एकाधिकार, अपूर्ण स्पर्धेत किंमत कशी निश्चित होते. कालावधीनुसार किंमत कशी निश्चित होते? याचा सूक्ष्म अर्थशास्त्र विचार करते.

४) वितरण - उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या घटकांचा मोबदला (खंड, मजुरी, व्याज, नफा) कसा निश्चित होतो त्याच्या सिध्दांताचे विश्लेषण करते.

## सूक्ष्म अर्थशास्त्राचे गुण किंवा महत्व -

१) संपूर्ण अर्थव्यवस्थेचे अध्ययन - सूक्ष्म अर्थशास्त्र एका एका घटकाचा अभ्यास करते. असे एक एक घटक मिळून संपूर्ण अर्थव्यवस्था बनते. संपूर्ण अर्थव्यवस्थेचे अध्ययन करण्यासाठी वेगवेगळ्या घटकांचे वैयक्तिक स्वरूपात अध्ययन व विश्लेषण करणे आवश्यक आहे.

२) उपभोक्ता व उत्पादक यांना उपयुक्त - सूक्ष्म अर्थशास्त्र वैयक्तिक उपभोक्त्यांना महत्तम समाधान प्राप्त करण्यासाठी आपले मर्यादित उत्पन्न विविध वस्तूवर कसे विभागावे यासाठी मदत करते तर उत्पादकांना महत्तम नफा प्राप्त करण्यासाठी उत्पादक घटकाच्या मात्रा किती प्रमाणात उपयोगात आणाव्या? वस्तूचे उत्पादन किती करावे? असे निर्णय घेण्यात मदत करते.

३) सरकारला आर्थिक धोरण ठरवितांना उपयुक्त - सरकारच्या आर्थिक धोरणाचा संपूर्ण अर्थव्यवस्थेवर प्रभाव पडतो. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात निर्माण झालेल्या वस्तू व सेवांची किंमत निर्धारित करतांना नफ्याचे उद्दिष्ट समोर न ठेवता सामाजिक कल्याणाचे उद्दिष्टय समोर ठेवावे लागते. अशा वस्तूच्या किंमतीचा इतर वस्तूंच्या

किंमतीवर परिणाम होतो. सूक्ष्म अर्थशास्त्र योग्य किंमत धोरण ठरविण्यासाठी सरकारला मदत करते तसेच सरकारच्या आर्थिक धोरणाचे मूल्यमापन करण्याचे कार्य सूक्ष्म अर्थशास्त्र करते.

४) आर्थिक नियम निर्माण करण्यासाठी उपयुक्त - सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्वपूर्ण साधन ''सीमांत विश्नेषण'' आहे. याच्या सहाय्याने अर्थशास्त्रात अनेक महत्वपूर्ण नियम निर्माण केले गेले. उदा. आऱ्हासी सीमांत उपयोगिता नियम, सम सिमांत उपयोगिता नियम, संतोषाधिक्य, आऱ्हासी सीमांत उत्पादकता नियम इ.

५) करारोपणासाठी उपयुक्त - करारोपणाचे समाजाच्या विविध वर्गावर परिणाम होतात. वस्तूवर किंवा उत्पन्नावर अतिरिक्त कर आकारल्यास सामाजिक कल्याणावर त्याचा किती विपरित परिणाम होईल? कराचा भार उपभोक्ते व विक्रेते यांच्यावर कसा वितरित होतो याचे अध्यन सूक्ष्म अर्थशास्त्रावरून होते.

६) आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्व - सूक्ष्म अर्थशास्त्राच्या सहाय्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अटी, देण्याघेण्याच्या आढाव्यातील असंतुलन, विनीमय दरातील उच्चावचने याचा अभ्यास करता येतो.

७) उत्पादक घटकाच्या कार्यक्षम उपयोगासाठी उपयुक्त - सूक्ष्म अर्थशास्त्राच्या सहाय्याने दुर्मिख असलेले उत्पादनाचे घटक कार्यक्षमरित्या कसे उपयोगात आणता येतील व घटकाचा युक्ततम वापर कसा करता येईल. यासंबंधी मार्गदर्शन करते.

८) महत्तम सामाजिक कल्याण साधण्यासाठी उपयुक्त - सूक्ष्म अर्थशास्त्र उत्पादन घटकाचा युक्त उपयोग कसा करता येईल? यासंबंधी मार्गदर्शन करते त्यामुळेच उत्पादन घटकाचा पुरेपुर उपयोग होऊन महत्तम आर्थिक कल्याण साध्य केल्या जाऊ शकते.

९) रेखीय प्रायोजनाचे ज्ञान ( Knowledge of Linear Programming) - सूक्ष्म अर्थशास्त्राच्या सहाय्याने रेखीय प्रायोजनासंबंधी तांत्रिक ज्ञान प्राप्त होते. ज्याच्या आधारे उत्पादक अनेक महत्वपूर्ण निर्णय घेऊ शकतात. उदा. याद्वारे उत्पादक ही माहिती प्राप्त करू शकतात की उत्पादनाची कोणती साधने भरपूर व कोणती कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. या द्वारे उत्पादक उप्तादन घटकांचा युक्ततम उपयोग करून आपले उत्पन्न महत्तम करण्याचा प्रयत्न करतात.

## सूक्ष्म अर्थशास्त्राचे दोष -

१) संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी अयोग्य - सूक्ष्म अर्थशास्त्र केवळ एका घटकाचे अध्ययन करीत असल्यामुळे एका घटकाच्या अभ्यासावरून काढलेले निष्कर्ष संपूर्ण अर्थव्यवस्थेला लागू होत नाही. व्यक्तिगत हित व सामाजिक हित ह्यात बरेच अंतर असते. उदा. एका व्यक्तीच्या दृष्टीने अधिक बचत करणे योग्य असते. परंतु संपूर्ण समाजाची बचत जास्त झाल्यास उपभोग खर्च कमी मागणी कमी व शेवटी रोजगार कमी होतो.

२) अवास्तविक गृहितावर आधारित - सूक्ष्म अर्थशास्त्र अशा अवास्तविक गृहितावर आधारित आहे की जे वास्तविक जीवनात आढळून येत नाही. उदा. पूर्ण रोजगार, पूर्ण स्पर्धा ई.

३) अर्थव्यवस्थेचे अपूर्ण चित्र - सूक्ष्म अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेच्या छोट्या छोट्या भागाचे अध्ययन करते त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संचालनासंबंधी योग्य माहिती उपलब्ध होऊ शकत नाही.

४) काही विशेष समस्यांसाठी अयोग्य - मौद्रिक धोरण, प्रशुल्क धोरण, सार्वजनिक ऋण, सार्वजनिक व्यय, पूर्ण रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न अशा महत्वपूर्ण समस्या ज्याचा संबंध संपूर्ण अर्थव्यवस्थेशी असतो अशा समस्यांचे अध्ययन करण्यांसाठी सूक्ष्म अर्थशास्त्र उपयुक्त ठरत नाही.

५) निर्हस्तक्षेप धोरणावर आधारित (Laisseryfaire policy) - सूक्ष्म अर्थशास्त्राचे विश्लेषणात निर्हस्तक्षेपाचे धोरण गृहित धरले आहे. वास्तविक परिस्थितीत निर्हस्तक्षेपाचे धोरण अस्तित्वात नाही. म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्राचे विश्लेषण वास्तविक ठरत नाही.

## स्थुल अर्थशास्त्र (Macro Economics)

स्थुल अर्थशास्त्राची व्याख्या - प्रा. बोल्डींग यांच्या मते ''स्थूल अर्थशास्त्र विषयाचा असा भाग आहे की जो अर्थव्यवस्थेतील विशिष्ट बाबींचा अभ्यास करण्यापेक्षा मोठ्या समग्राच्या व सरासरीच्या अभ्यासाशी संबंधित असून उपयुक्ततेच्या दृष्टीकोणातून समग्राची व्याख्या करणे त्यांचा कसा संबंध आहे व ते कसे निश्चित होतात त्याचे परिक्षण करते.''

"Macro Economics is that part of the subject which deals with the great aggregates and averages of the system rather then with particular iatems in it, and attempts to dfine these aggregates in a useful manner and to examine relationship."

व्याख्येवरून हे स्पष्ट होते की स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेतील एकूण घटकाचा अभ्यास करते व त्या घटकातील परस्पर संबंधाचे परीक्षण करते. स्थूल अर्थशास्त्रालाच समष्टी अर्थशास्त्र, व्यापक अर्थशास्त्र उत्पन्न व रोजगार सिध्दांत, उत्पन्न विश्लेषण सामूहिक पध्दती अर्थशास्त्र, समष्टी भाव या नावाने आळखले जाते. आर्थिक विश्लेषणाची एक शाखा या स्वरूपात स्थूल अर्थशास्त्राचा विकास औचित्यपूर्ण आहे. गेल्या अर्धशतकात समष्टी अर्थशास्त्राचा विकास झपाट्याने होत आहे. प्रा. आर. जी. डी. ऐलन यांच्या मते, ''समष्टी अर्थशास्त्राच्या विकासामूळे अर्थशास्त्राच्या संपूर्ण संरचनेमध्ये मोठ्या प्रमाणात उलथापालथ होत आहे.''

१९२६ मध्ये केन्स यांनी नावाचा ग्रंथ प्रकाशित केला व समष्टी अर्थशास्त्राच्या विकासाला प्रोत्साहन दिले. १९२९ ची जागतिक महामंदी व त्यानंतर विभिन्न देशातील सरकारांद्वारे व्यापारचक्राला नियंत्रित करण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न, महायुध्दांनंतर आलेली स्फित्ती, जगातील अर्धविकासित राष्ट्रांचे विकासासाठी प्रयत्न या साऱ्या घटना समष्टी अर्थशासत्राला लोकप्रियता मिळवून देण्याच्या दृष्टीने सहाय्यक ठरल्या.

## स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती -

स्थूल अर्थशास्त्रात खालील सिध्दांताचा अभ्यास केला जातो.

१) उत्पन्न, उत्पादन व रोजगार सिध्दांत- ह्यात गुंतवणूक सिध्दांत उत्पन्न, उत्पादन, रोजगार वाढीचे सिध्दांत, प्रभावी मागणी, उपभोग प्रवृत्ती, तेजी मंदीचे व्यापार चक्र ह्या विषयी सिध्दांताचा अभ्यास केला जातो.
२) सामान्य किंमत पातळीचे सिध्दांत - ह्यात मुद्रामुल्याचे सिध्दांत, स्फित्ती, अपस्फित्ती, संस्फित्ती, विस्फित्ती इत्यादींचा विचार करण्यात येतो.
३) राष्ट्रीय उत्पन्न व त्याचे वितरण सिध्दांत - ह्यात राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याचे मार्ग, राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण कसे करावे? करारोपणाद्वारे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, राष्ट्रीय उत्पन्नातून सार्वजनिक व्यय व त्याचे सिध्दांत, महत्तम सामाजिक लाभाचे सिध्दांत ह्याचे अध्ययन केले जाते.
४) आर्थिक विकासाचे सिध्दांत - ह्यात विकसित व अर्धविकसित राष्ट्रे अशा देशातील रोजगार व उत्पन्न वाढीचे अध्ययन केले जाते.

## स्थूल अर्थशास्त्राचे महत्व किंवा गुण -

अर्थशास्त्राच्या विश्लेषणाचा मुख्य उद्देश एका व्यक्तिचे हित हा नसून संपूर्ण समाजाचे कल्याण हा आहे. शिवाय स्थूल अर्थशास्त्र अंदाजपत्रक, करारोपण, मुद्रास्फिती व अपस्फिती ते दूर करण्याचे उपाय, बेरोजगारी अशा व्यापक प्रश्नांचे अध्ययन करते. पुढील मुद्द्यांवरून सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्व स्पष्ट होते.

१) संपूर्ण अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजण्यास उपयुक्त - व्यक्तिगत एका एका घटकाद्वारे संपूर्ण अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजू शकत नाही. आधुनिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप अतिशय गुंतागुंतीचे झाले आहे. अशा अर्थव्यवस्थेचे खरे स्वरूप समजण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.
२) आर्थिक धोरण तयार करण्यासाठी उपयुक्त - सरकारला आर्थिक धोरण तयार करतांना एक व्यक्ती किंवा पेढीचा अभ्यास करून चालत नाही तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करून धोरण ठरवावे लागते कारण हे संपूर्ण समाजासाठी उपयुक्त असते. हे धोरण ठरवितांना स्थूल अर्थशास्त्राची मदत होते.
३) राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यास उपयुक्त - व्यापार चक्र व त्यातून येणारी स्फिती अपस्फिती नियंत्रित करण्यासाठी करावी लागणारी उपाय योजना बेरोजगारी कमी करून रोजगारी वाढविणे, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे. महत्तम सामाजिक कल्याणासाठी सार्वजनिक उपयुक्तेच्या उद्योगावर कसा खर्च करावा? हे प्रश्न सोडविण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.
४) सूक्ष्म अर्थशास्त्राला पुरक - सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अंतर्गत ज्या आर्थिक नियमांचे स्पष्टीकरण केले जाते. ते नियम तयार करतांना स्थूल अर्थशास्त्राची मदत होते. उदा. मागणीचा नियम तयार करण्यासाठी समाजातील अनेक व्यक्तींच्या मागणरचा अभ्यास करून सर्वसामान्य आढळणाऱ्या प्रवृत्तीवरून हा नियम तयार केला गेला किंवा आऱ्हासी उपयोगिता नियम निर्माण करतांना अनेक व्यक्तींच्या समूहाच्या उपयोगितेच्या अभ्यासावरून हा नियम तयार झाला.
५) भौतिक कल्याण व आर्थिक प्रगतीचे मोजमाप करण्यास उपयुक्त - सरकार किंवा अर्थव्यवस्था जनतेचे भौतिक कल्याण आणि आर्थिक प्रगती व्हावी या दृष्टीनेच कार्य करीत असते. भौतिक कल्याणात वाढ झाली किंवा नाही? हे एका व्यक्तीच्या अभ्यासावरून कळू शकत नाही. तर यासाठी एकूण राष्ट्रीय उत्पन्न, एकूण रोजगार एकूण गुंतवणूक कळू शकत नाही. तर यासाठी एकूण राष्ट्रीय उत्पन्न, एकूण रोजगार एकूण गुंतवणूक यांचा अभ्यास करण्याची गरज आहे व हे स्थूल अर्थशास्त्राच्या मदतीने शक्य होते.
६) मुद्रामूल्यातील बदलाचे अध्ययन करण्यास उपयुक्त - मुद्रा मुल्य कसे निश्चित होते. यासंबंधी मुद्रा परिणाम सिध्दांत, मुद्रामूल्यातील बदल, स्फिती, अपस्फिती त्याचे समाजातील विभिन्न वर्गावर होणारे परिणाम यांचे अध्ययन स्थूल अर्थशास्त्राच्या सहाय्याने करता येते.

## स्थूल अर्थशास्त्राचे दोष किंवा मर्यादा -

स्थूल अर्थशास्त्राची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असली तरी त्यात काही दोष आढळतात. त्यामुळे स्थूल अर्थशास्त्राच्या आधारे जर सरकारी धोरण तयार करायचे असेल तर हे दोष लक्षात घेऊन उपाय योजना करावी लागेल.

१) वैयक्तिक निष्कर्षाचे सामान्यीकरण अयोग्य - एका व्यक्तीसाठी योग्य असलेले निष्कर्ष संपूर्ण अर्थव्यवस्थेला लागू पडत नाहीत. वैयक्तिक निष्कर्ष व अर्थव्यवस्थेचे निष्कर्ष यात विरोधाभास आढळतो. उदा. एका व्यक्तीने अधिक

बचत करणे हे फायदयाचे आहे. परंतु संपूर्ण समाजाची बचत जास्त असल्यास उपभोग खर्च कमी - मागणी कमी - उत्पादन कमी - व बेरोजगारीत वाढ होते.

एका व्यक्तीजवळ मुद्रेचे परिमाण वाढल्यास ते लाभकारक असते. परंतु संपूर्ण समाजाजवळील मुद्रेचे परिमाण वाढल्यास मुद्रास्फिती निर्माण होते. एका व्यक्तीने अधिकोषाजवळील आपल्या ठेवी काढण्यात धोका नाही. परंतु संपूर्ण खातेदारांनी ठेवी काढल्यास बँक संकटात सापडेल. एका उद्योगात मजुरीचे दर कमी करून रोजगार वाढवित येईल परंतु सर्वच श्रमिकांचे मजुरीचे दर कमी केल्यास मागणी कमी, उत्पादन कमी व बेरोजगारी वाढेल.

२) समूहात समरूपतेचा अभाव - स्थूल अर्थशास्त्र ज्या समूहाचा अभ्यास करते त्या समूहातील घटक समरूप असतात असे मानणे चुकीचे आहे. उदा. उद्योगातील श्रमिकांची संख्या कमी होऊन शेतीतील श्रमिकांची संख्या वाढली तरी एकूण श्रमिकांची संख्या पूर्वी इतकीच कायम राहील. परंतु श्रमिकांच्या वैयक्तिक जीवनावर त्याचा विपरीत परिमाण होईल.

अशा परिस्थितीत श्रमिकांची संख्या तेवढीच कायम आहे असे गृहीत धरून धोरण आखणे योग्य होणार नाही. कृषी क्षेत्रातील श्रमिकांसाठी वेगळे धोरण व उद्योगातील श्रमिकांसाठी वेगळे धोरण असायला पाहिजे.

३) स्थूल अर्थशास्त्राच्या निष्कर्षाचा विषम प्रभाव - स्थूल अर्थशास्त्राच्या निष्कर्षाचा समाजाच्या विभिन्न स्तरावर सारखा प्रभाव पडू शकत नाही. उदा. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास समाजातील सर्वच व्यक्तींच्या उत्पन्नात वाढ झाली असे समजणे चुकीचे आहे. काही लोकांचे उत्पन्न वाढैल तर काही लोकांची गरिबी वाढेल. देशातील सामान्य किंमत पातळी वाढली तरी काही वस्तूंच्या किंमती वाढतील तर काही वस्तूंच्या किंमती कमी होतील.

४) विजातीय घटकांच्या मापनात अडचणी - स्थूल अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करीत असतांना अडचणी येतात. उदा. कृषि माल क्विंटलमध्ये उद्योगातील माल नगामध्ये मोजल्यास बेरीज कण्यात अडचण येते. मुद्रेमध्ये मापन करता येते. परंतु मुद्रेचे मूल्य स्थिर राहत नाही. म्हणून योग्य मोजमाप होऊ शकत नाही.

५) अर्थव्यवस्थेसंबंधी चुकीचे निष्कर्ष - कधी कधी आर्थिक समूहाच्या अभ्यासावरून असा निष्कर्ष निघतो की अर्थव्यवस्थेमध्ये कोणतेही परिवर्तन झालेले नाही त्यामुळे कोणत्याही नवीन सरकारी धोरणाची आवश्यकता नाही. समजा, शेतमालाच्या किंमती २५ टक्के नी कमी झाल्या व उद्योगातील मालाच्या किंती २५ टक्केने वाढल्या तर त्याचा सामान्य मूल्यस्तरावर कोणताही परिणाम होणार नाही. अशा परिस्थितीत जर स्थूल विश्लेषणावर निर्भर राहिले तर कोणत्याही नवीन आर्थिक धोरणाची आवश्यकता नाही. परंतु प्रत्यक्षात शेतमालाच्या किंमती २५ टक्केनी कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी सरकारला नवीन धोरण स्वीकारावे लागेल. अशा तऱ्हेने आर्थिक समूहावरून काढलेले निष्कर्ष भ्रामक असतात.

## सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्रातील फरक

सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र यातील महत्वाचे फरक पुढीलप्रमाणे आहेत.

| सूक्ष्म अर्थशास्त्र | स्थूल अर्थशास्त्र |
|---|---|
| १) सुक्ष्म अर्थशास्त्र विशिष्ट एककाचा अभ्यास करते. उदा. एक पेढी, एक उद्योग, एका वस्तूची मागणी, किंमत इ. | १) स्थूल अर्थशास्त्र, संपूर्ण अर्थव्यवस्था प्रमुख समूह किंवा घटकांच्या सरासरीचा अभ्यास करते. उदा. एकूण राष्ट्रीय उत्पन्न, एकूण बचत, एकूण गुंतवणूक एकूण रोजगार इ. |

| | |
|---|---|
| २) सूक्ष्म अर्थशास्त्र आंशिक संतुलनाचा अभ्यास करते. | २) स्थूल अर्थशास्त्र सामान्य संतुलनाचा अभ्यास करते. |
| ३) सूक्ष्म अर्थशास्त्र व्यक्ती आणि व्यक्तीच्या व्यवहाराचा अभ्यास करत. | ३) स्थूल अर्थशास्त्र संपूर्ण समाज व त्याचा व्यवहाराचा अभ्यास करते. |
| ४) सूक्ष्म अर्थशास्त्र सीमांत विश्लेषणावर आधारलेले आहे. | ४) स्थूल अर्थशास्त्र समस्त विश्लेषणावर आधारित आहे. |
| ५) देशाची आर्थिक धोरणे ठरविण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्र उपयुक्त ठरत नाही म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्र मर्यादित उपयुक्त आहे. | ५) देशाची आर्थिक धोरणे ठरविण्याकरिता स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते म्हणून स्थूल अर्थशास्त्र व्यापक, उपयुक्त आहे. |
| ६) सूक्ष्म अर्थशास्त्राचा अभ्यास विषय मागणी, पुरवठा, किंमत, खंड, मजुरी, व्याज, नफा, उपयोगिता, आर्थिक कल्याण हा आहे. | ६) स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय, उत्पन्न, रोजगार, गुंतवणूक, आर्थिक विकास व्यापारचक्र, स्फिती, अपस्फिती हा आहे. |

सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र यात फरक असला तरी अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी दोन्ही पध्दती उपयुक्त आहेत. सूक्ष्म अर्थशास्त्रातील कोणत्याही एका घटकात बदल झाल्यास त्याचा परिणाम समग्र घटकांवर होतो म्हणजेच स्थूल अर्थशास्त्रावर होतो. याऊलट स्थूल अर्थशास्त्रातील कोणत्याही एका समग्र घटकात बदल झाल्यास त्याचा परिणाम सूक्ष्म घटकावर होतो. म्हणून स्थूल अर्थशास्त्र व सूक्ष्म अर्थशास्त्र हे एकमेकाला पूरक आहे. प्रा. ॲक्ले यांच्या मते, ''सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र यांच्यामध्ये काटेकोर विभाजन करता येत नाही. सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र हे आर्थिक विश्लेषणाच्या मार्गाचे दोन भाग आहेत.''